असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे १९, २००५/वैशाख २९, शके १९२७

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . ३८८-३९१

दिनांक १७ मे २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे:—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १९ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२००४ चा महा. अध्या. ४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा दिनांक ६ मार्च २००४ रोजी प्रख्यापित केला होता ;

२००४ चा महा. अध्या. ४. **आणि ज्याअर्थी,** दिनांक १५ मार्च २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००४ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठीचे, विधेयक (सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३) देखील दिनांक १७ मार्च २००४ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते, तथापि, राज्य विधानमंडळाच्या उक्त सत्राची त्याच दिवशी समाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;


[**किंमत** : रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अमंलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक १८ मे २००४ रोजी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** २४ मे २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७) देखिल दिनांक ३ जून २००४ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची दिनांक ११ जून २००४ रोजी सत्रसमाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या समाप्तीनंतर, म्हणजेच, दिनांक ४ जुलै २००४ नंतर, सन २००४ चा, तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेश क्रमांक १२ अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाच्या तरतुदींचे प्रवर्तन चालू ठेवणे इष्ट वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाच्या तरतुदींचे प्रवर्तन चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि म्हणून त्यांनी दिनांक ३ जुलै २००४ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. १७.

**आणि ज्याअर्थी,** पुढे चालू ठेवण्यासंबंधीच्या उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज करून, दिनांक ६ मार्च २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४४क च्या,— १९६६ चा महा. ४१.

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (दोन) नंतर " शेतीच्या प्रयोजनासाठी " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" कोणत्याही जमिनीचे खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी, किंवा

(तीन) खाजगी विकासकाने हाती घेतलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या कोणत्याही जमिनीचे विशेष वसाहत प्रकल्पासाठी." ;

(दोन) शर्त (ख) मध्ये, " खराखुरा औद्योगिक वापर " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) शर्त (घ) मध्ये, "उद्योग " या शब्दानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(चार) शर्त (ई) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, भारत सरकारकडून पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रास या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होणार नाही." ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, "खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (५) मध्ये, " खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासंबंधीची " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासंबंधीची, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) स्पष्टीकरणामध्ये, " किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा उपक्रम " या मजकुरानंतर, " किंवा, पर्यटनस्थळ किंवा गिरीस्थान म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील पर्यटनाचा उपक्रम, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो १ जुलै २००० पासून समाविष्ट केला असल्याचे मानण्यात येईल ;

(ङ) विद्यमान स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण-एक असा नवीन क्रमांक दिला जाईल व नवीन क्रमांक दिलेल्या स्पष्टीकरण-एक नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण-दोन**.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " विशेष वसाहत प्रकल्प " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींखाली, शासनाने विशेष वसाहतीच्या विकासासाठी तयार केलेल्या विनियमांखालील एक किंवा अनेक विशेष वसाहत प्रकल्प, असा आहे. ".

१९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यांच्या कलम ३२८ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ३२८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (सोळा-क) मध्ये, " जमिनीचा खराखुरा औद्योगिक वापर " या मजकुरानंतर " किंवा विशेष वसाहत प्रकल्पासाठी वापर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. १७.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, पुढे चालू ठेवण्यासंबंधीच्या उक्त अध्यादेशाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या उक्त संहिते अन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या, उक्त संहितेच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई